# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २९/०४/२०२४ (सोमवार) सायंकाळ

---

### पो.स्टे. मौदा हद्दीमधील परसोडी दिघोरी शेत शिवार येथे जुगार अड्डयावर धाड

### —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २८/०४/२०२४ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन मौदा हद्दीतील परसोडी दिघोरी शेत शिवार येथील जुगार अड्डयावर रेड केली असता यातील **आरोपी नामे—१) संजय रामप्रसाद हेमने, वय २१ वर्ष, रा. अजय किराना स्टोअर जवळ नरसाळा रोड नागपुर २) विशाल पंढरीनाथ उईके वय २९ वर्ष रा. सेमडा तह नरखेड म. हु शिवकुमार चोपडे यांचे घरी किरायाणे खरबी टि पॉईन्ट गंगानगर नागपुर ३) हर्शल देवाजी भोंडे, वय १९ वर्ष रा. भिरगांव नागपुर ह. मु नरेंद्र ढोले यांचे घरी किरायाने स्वामीनारायन मंदीर जवळ वाटोळा नागपुर ४) अक्षय श्रीकांत वाटकर वय २३ वर्ष प्लॉट नं. ५३ बॅक कॉलनी नरसाळा दिघोरी नागपुर** हे सार्वजनीक ठिकाणी कोंबडयाची झुंज लडवुन हारजितचा खेळ खेळतांनी मिळुन आल्याने त्यांच्याकडून १) निळया रंगाचा वनप्लस कंपनीचा एन्ड्राईट मोबाईल किंमती अंदाजे. १०,०००/— रू. २) ओपो कंपनीचा एन्ड्राईट मोबाईल किंमती अंदाजे. ५,०००/— रू. ३) रिअलमी कंपनीचा एन्ड्राईट मोबाईल किंमती अंदाजे. १०,०००/— रू एकुण २५,०००/— रू. ४) कळया रंगाची निडे पटटे असलेली पॅशन मो.सा क्र. एम.एच. ३१ डि.एन. ४३०७ किंमती अंदाजे २०,०००/—रू. ५) चार आरोपीच्या अंग झडतीत एकुण १,६५०/—रू नगदी ६) दोन लोखंडी कात्या किंमती प्रत्येकी ५०/— रू. एकुण १००/— रू माल असा एकुण ४६,७५०/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूद्ध पोस्टे मौदा येथे कलम १२ (ब) महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतिशसिंग राजपूत, सपोनि मनोज चौधरी, पोउपनि महेश बोथले, पोहवा गौतम, गणेश मुदमाळी, पोशि आशिष निपाने, आतिश गाढवे यांनी पार पाडली.

## अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक २८/०४/२०२४ रोजी पोस्टे कुही येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार, मौजा किन्ही कडुन एक इसम मोटरसायकलने अवैधरीत्या दारूची वाहतूक करीत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून किन्हीकडे जाणाऱ्या रोडवर स्टाफने नाकाबंदी केली असता **आरोपी नामे— आरोपी संजय अशोक कांबळे, वय ३२ वर्ष, रा. राजोला ता. कुही जि. नागपूर** हा आपल्या ताब्यातील टी.वी.एस कंपनीची ज्युपीटर मो.सा. क्र. एम. एच.—३६/ए.एम १७५७ किंमती ४००००/— रू. येताना दिसल्याने त्याला थांबण्याचा इशारा केला असता न थांबता भरधाव वेगाने मोटरसायकलने पळुन गेला. त्याचा पाठलाग करून किन्ही फाटा येथे थांबवुन दारूबाबत झडती घेतली असता मोटरसायकलचे पायदानावर एका पांढऱ्या रंगाच्या चुंगडीत काळया रंगाच्या टयुबमध्ये २० लिटर मोहाफुल गावठी दारू प्रत्येकी लिटर किंमती १००/—रू प्रमाणे किंमती २०००/—रू चा माल व टी.वी.एस कंपनीची ज्युपीटर मो.सा. क्र. एम. एच.—३६/ए.एम— १७५७ किंमती ४००००/— रू. वर वाहतुक करून घेवुन जात असतांना मिळुन आल्याने असा एकुण ४२०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपी विरुध्द गुन्हा नोंद करुन तपासात घेतला. आरोपीविरूद्ध पोस्टे कुही येथे कलम ६५ अ(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कुही येथील प्रभारी ठाणेदार सहा. पोलीस अधिक्षक दिपक अग्रवाल सा. (भापोसे), पोहवा सुधीर ज्ञानबोनवार, पोशि रंजित मेश्राम यांनी केली.

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. नरखेड** :— फिर्यादी नामे— शैला अजय पाटील, वय ४२ वर्ष, रा. पालासवळी पारशिवनी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे अप. क्र. १९२/२१ कलम ३०२, ३०७, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील मृतक नामे— रोशन शेषराव बनाईत, वय ३२ वर्ष, रा. बेलोना ता. नरखेड जि. नागपूर याने **आरोपी क्र. १) नामे— विलास जंगलुजी कवडती, वय ४५ वर्ष रा. गोंडेगाव यास तुमच्या मुलीने ठाकुर सोबत पळून जावुन केले आहे. असे म्हटले असता त्याचा राग मनात धरून आरोपी क्र. २) शुभम विलास कवडती, वय २४ वर्ष, रा. गोंडेगाव ३) नितेशबाळकृष्ण कवडती, वय २८ वर्ष रा. गोंडेगाव ४) रोहीत रत्नाकर कवडती, वय २१ (मरण पावला आहे.) रा. गोंडेगाव** यांनी संनगणमत करून मृतकास तसेच फिर्यादी व इतर जख्मी यांना लाठ्या काठया गोटे व हाथा बुक्याने मारहाण करून रोशन बनाईत याला ठार केले व इतरांना गंभीर जख्मी केले व जीवाने मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस निरीक्षक जयपालसिंग गिरासे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे. ०८ श्री. पडवल सा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनाक २९/०४/२०२४ रोजी मा. डी. जे. ०८ श्री. पडवल सा. यांनी वरील नमुद आरोपी क्र. ०१ ते ३ यांना कलम ३०२ भादंवि मध्ये आजीवन कारावास ५०००/—रू. दंड प्रत्येकी दंड न भरल्यास ०१ वर्षाची शिक्षा कलम ३२४ भादंवि मध्ये ०१ वर्ष कारावास व १०००/—रू. प्रत्येकी दंड व दंड न भरल्यास ३ महिने शिक्षा कलम ३२६ भादंवि मध्ये ४ वर्ष शिक्षा व ३०००/—रू. दंड प्रत्येकी व दंड न भरल्यास ९ महिने शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री तामगाडगे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सफौ गणेश पाल यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**